**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्र.-रानिआ/नप-२०१७/प्र.क्र.१३/का.६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई, ४०० ०३२.
**दिनांक :- ११/१२/२०१७.**

प्रति,
जिल्हाधिकारी,
पालघर व नंदुरबार

विषय :- नंदुरबार, नवापूर या २ नगरपरिषदा व वाडा नगरपंचायतीच्या मतमोजणीच्या दिनांकामध्ये बदल करण्याबाबत...

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.०७/११/२०१७ रोजीचे आदेश.
२. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे पत्र.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन क्रमांक १ येथील दि.०७/११/२०१७ च्या आदेशान्वये पालघर जिल्ह्यातील डहाणू, जव्हार व वाडा (नवनिर्मित) तसेच नंदूरबार जिल्ह्यातील नंदूरबार, नवापूर व तळोदा या ६ नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. या कार्यक्रमानुसार मतदान दि.१३/१२/२०१७ व मतमोजणी दि.१४/१२/२०१७ रोजी घेण्याचे ठरविले होते.

२. वरील ६पैकी ३ ठिकाणी (डहाणू, जव्हार व तळोदा) नामनिर्देशनपत्रांच्या छाननीअंती व्यथित झालेल्या काही उमेदवारांनी संबंधित मा. जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले होते, ज्याचा निकाल दि.४ व ५ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेला आहे. या निकालानुसार वरील ३ नगरपरिषदांकरिता (डहाणू, जव्हार व तळोदा) मतदानाचा सुधारित दिनांक १७/१२/२०१७ व मतमोजणीचा सुधारित दिनांक १८/१२/२०१७ जाहीर करण्यात आलेला आहे. ( संदर्भीय आदेश क्र.२ दि.०८/१२/२०१७ अन्वये )

३. या दोन आदेशांमुळे पालघर जिल्ह्यातील वाडा नगरपंचायतीची मतमोजणी दि.१४/१२/२०१७ रोजी व डहाणू व जव्हार या २ नगरपरिषदांची मतमोजणी दि.१८/१२/२०१७ रोजी होणार आहे. तसेच

नंदूरबार जिल्ह्यातील नंदूरबार व नवापूर या २ नगरपरिषदांची मतमोजणी दि.१४/१२/२०१७ रोजी व तळोदा नगरपरिषदेची मतमोजणी दि.१८/१२/२०१७ रोजी होणार आहे.

४. पालघर जिल्हयातील वाडा, यांचा निकाल (दि.१४/१२/२०१७) लागल्यानंतर डहाणू व जव्हार या नगरपरिषदांचे मतदान (दि.१७/१२/२०१७) रोजी होणार आहे व तसेच नंदूरबार जिल्हयातील नंदूरबार व नवापूर यांचा निकाल लागल्यानंतर तळोदा नगरपरिषदेचे मतदान होणार आहे. अशामुळे एका जिल्हयातील लागलेल्या निकालामुळे त्या जिल्हयातील पुढील होणा-या मतदानावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे तोंडी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

| जिल्हा | नगरपरिषद/नगरपंचायत | मतदान | मतमोजणी |
|---|---|---|---|
| पालघर | डहाणू | १७/१२/२०१७ | १८/१२/२०१७ |
| | जव्हार | १७/१२/२०१७ | १८/१२/२०१७ |
| | वाडा | १३/१२/२०१७ | १४/१२/२०१७ |
| नंदूरबार | नंदूरबार | १३/१२/२०१७ | १४/१२/२०१७ |
| | नवापूर | १३/१२/२०१७ | १४/१२/२०१७ |
| | तळोदा | १७/१२/२०१७ | १८/१२/२०१७ |

५. वरील तक्रारी लक्षात घेता व मतदानावर कसल्याही प्रकारचा विपरित परिणाम होता कामा नये यादृष्टीने पालघर व नंदूरबार जिल्ह्यातील वरील सर्व ६ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी दि.१८/१२/२०१७ रोजी करण्याचे राज्य निवडणूक आयोगाकडून आदेश देण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी, नंदूरबार व पालघर यांनी मतमोजणीच्या दिनांकामध्ये झालेल्या बदलाच्या अनुषंगाने प्रसिध्दी देऊन योग्य ती कार्यवाही करावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. विभागीय आयुक्त, कोकण व नाशिक
८. जिल्हा पोलिस अधिक्षक, पालघर व नंदुरबार
९. मुख्याधिकारी, नंदुरबार, नवापूर व वाडा नगरपरिषद
१०. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४
११. सहायक आयुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१३. निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई